मेहकर येथे मातंग समाजाचा पार पडला निर्धार मेळावा >>पान 2

ढोल ताशांच्या गजरात, बाप्पाचे ठाणे नगरीत आगमन, वृंदावनच्या राजाचे जल्लोषात स्वागत >>पान 3

कमिशन खोरीलावाचा फोडण्यासाठी मी जनतेचा सक्षम उमेदवार भैय्यासाहेब पाटील >>पान 3

सुविचार

आजचा संघर्ष उद्याचे सामर्थ्य निर्माण करतो, विचार बदला आयुष्य बदलेल.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



माँ जिजाऊच्या चरणी नतमस्तक होऊन रविकांत तुपकर यांचे शेतकऱ्यांसाठी अन्नत्याग आंदोलन

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 25 ■ रविवार, दि. 01 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## गोमांस खाल्ल्याच्या संशयावरुन मजुराची मारहाण करुन हत्या, गोरक्षा समितीच्या पाच सदस्यांना अटक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : एका प्रवासी मजुराची गोमांस खाल्ल्याच्या संशयावरुन लोकांनी हत्या केली. गोमांस खाल्ल्याचा संशय आल्याने या मजुराला जमावाने मारहाण केली. या मारहाणीत या मजुराचा मृत्यू झाला. या प्रकरणात पोलिसांनी गोरक्षा समितीच्या पाच जणांना अटक केली. या प्रकरणात दोन अल्पवयीन मुलांचा समावेश आहे.

मजूर कुठला आहे? घटना कुठे घडली?

साबिर मलिक असे मारहाणीत मृत्यू झालेल्या मजुराचे नाव आहे. तो पश्चिम बंगालचा आहे. हरियाणा या ठिकाणी चरखी दादरी भागात तो आला होता. त्यावेळी त्याने गोमांस खाल्ले असावे या संशयातून त्याला मारहाण करण्यात आली. पोलिसांनी या प्रकरणी पोलिसांनी ही माहिती दिली की हरियाणा चरखी दादरी भागात हा मजूर आला होता. याने गोमांस खाल्लं असा संशय आल्याने जमावाने या मजुराला आणि आणखी एकाला बेदम मारहाण केली. या घटनेत साबिर मलिक याचा मृत्यू झाला. ही घटना २७ ऑगस्टला घडली आहे. दुसरा मजूर गंभीर जखमी आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितल्या प्रमाणे २७ तारखेलाच सबिरची हत्या करण्यात आली.

पोलिसांनी काय माहिती दिली आहे?

पोलिसांनी सांगितल्याप्रमाणे, गोरक्षा समितीचे अभिषेक, मोहित, रविंदर, कमलजीत, साहिल यांनी साबिर मलिकला प्लास्टिकच्या बॉटल विकण्याच्या निमित्ताने दुकानात बोलवलं होतं. त्यानंतर जेव्हा साबिर तिथे आला >>पान २

# लाडकी बहिण योजना आणून आम्ही काही चूक केली का? देवेंद्र फडणवीसांचा सवाल

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : लाडकी बहिण योजना आणून आम्ही काही चूक केली का? असा सवाल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी महिलांना केला आहे. तसेच ही योजना सुरु ठेवायची की, नाही? असाही सवाल त्यांनी केला.

शनिवारी, नागपूरात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना' मेळावा पार पडला. यावेळी ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आतापर्यंत जवजवळ १ कोटी ६० लाख महिलांच्या खात्यात ३ हजार रुपये सरकारने जमा केले आहेत. ही योजना





सुरु झाली त्यावेळी कुणाच्याच खात्यात पैसे जाणार नाही, १० टक्के महिलांनाही पैसे मिळणार नाहीत, अशा वल्गना काँग्रेस आणि मविआचे नेते करत होते. पण त्यांनी आमच्या बहिणींना विचारावं, त्यांच्या खात्यात पैसे पोहोचले आहेत. त्यामुळे तुम्ही कितीही दुषणं दिली तरी आमच्या बहिणींच्या खात्यात आम्ही पैसे पोहोचवले आहेत.

आम्ही लाडकी बहिण योजना आणून काही चूक केली का? ही योजना सुरु ठेवायची आहे का? मुलींना मोफत शिक्षण, शेतकऱ्यांना मोफत वीज, महिलांना एसटीमध्ये ५० टक्के सवलत, गुलाबी रिक्षा, शुभमंगल विवाह योजना, लेक लाडकी योजना, १ रुपयात पीक विमा या सगळ्या योजना सुरु ठेवायच्या की नाही? असा सवाल त्यांनी केला.

ते पुढे म्हणाले की, राजकारणात वेगवेगळे पक्ष असून शकतात पण लाडकी बहिण योजना बंद करण्यासाठी काँग्रेसचे अनिल वडपल्लीवार उच्च न्यायालयात गेले आहेत. हे अनिल वडपल्लीवार नाना पटोले आणि विकास ठाकरेंचे निवडणूक प्रमुख होते. तसेच ते सुनील केदारांचे राईट हँड म्हणून ओळखले जातात. ते कोर्टात गेले आणि या सगळ्या योजना बंद करा म्हणाले.पण जोपर्यंत तुमचा देवा भाऊ आहे तोपर्यंत आम्ही हायकोर्टात मोठ्यात मोठा वकिल उभा करू. आम्हाला या राखीची आण आहे. काहीही झालं तरी या योजनेवर स्थगिती येऊ देणार नाही. पण बहिणींनो यांची नियत समजून घ्या, असेही ते म्हणाले.

## आयुर्वेदिक उपचार पद्धतीला सर्वसामान्याची पसंती; अधिक प्रचार-प्रसार होणे गरजेचे : केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव





दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : सर्वसामान्य जनता आता आयुर्वेद उपचार पद्धतीला पसंती देत आहे लोकाचा विश्वास आयुर्वेदिक पद्धतीवर बसला आहे या उपचार पद्धतीचा अधिक विकसित करून तिचा प्रचार प्रसार करणे गरजेचे आहे असे मत केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केले दिल्ली येथील अखिल भारतीय आयुर्वेदिक संस्थांच्या वतीने पाण्डुलिपी इकाई ( मेनु स्क्रिप्ट म्युझियम ) चे उद्घाटन ३० ऑगस्टला आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव बोलत होते ते पुढे म्हणाले की आयुर्वेद ही आपली प्राचीन चिकित्सा पद्धती आहे या पद्धतीचा प्रचार आणि प्रसार पाहिजे त्या प्रमाणात झाला नव्हता पण २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने आयुष मंत्रालयाची स्थापना केली आणि आयुर्वेद चिकित्सा प्रणाली नवीन दिशा देण्याचं काम केलं आयुर्वेद ही भारताची प्राचीन चिकित्सा प्रणाली आहे तिचे ज्ञान जतन करून अभ्यास करण्याच्या दृष्टिकोनातून १७ ऑक्टोंबर २०१७ ला अखिल भारतीय आयुर्वेदिक संस्थांची स्थापना करण्यात आली आता



पर्यंत २६ लाखापेक्षा जास्त रुग्णांवर यशस्वीरित्या आयुर्वेदिक उपचार केल्या गेले आहे गेल्या सात वर्षांमध्ये अखिल भारतीय आयुर्वेदिक संस्थान महत्वपूर्ण प्रगती केली असून वैश्विक स्तरावर ज्ञान संपादन करणारे हे आयुर्वेदिक संस्थान प्रमुख केंद्र बनले आहे अशी माहिती केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली यावेळी अखिल भारतीय आयुर्वेदिक संस्थांचे निदेशक डॉ तनुजा उपमहा निदेशक सत्यजित पॉल ए आय आय चे प्रमुख डॉ महेश व्यास डॉ आनंद शर्मा महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य विभागाचे संचालक सोहम वायाळ उपस्थित होते अखिल भारतीय आयुर्वेदिक संस्थांच्या निदेशिका डॉ तनुजा यांनी आयुर्वेदिक उपचार पद्धतीचा प्रचार प्रसार करण्यासाठी आगामी काळात काम करणार असल्याचे सांगत अखिल भारतीय आयुर्वेदिक संस्थांच्या वतीने केल्या जात असलेल्या कामकाजाची माहिती दिली.

१७ ते १९ ऑक्टोबर दरम्यान आंतरराष्ट्रीय आयुर्वेदिक संमेलन होणार आहे या संमेलनाची आरोह २०२४ या पुस्तिकेचे मुखपृष्ठ प्रकाशन हे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले त्यानंतर मंत्री महोदयांनी धन्वंतरी वाटिका व दवाखान्याची ही पाहणी केली या कार्यक्रमाला अखिल भारतीय आयुर्वेदिक संस्थान मधील प्राध्यापक डॉक्टर संशोधक उपस्थित होते.

## जन आरोग्य योजनेच्या ९ लाख ८७ हजारांहून अधिक रकमेवर चोरट्यांचा डल्ला

**मुंबई/प्रतिनिधी** : जी.टी. रुग्णालयात महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या रकमेवर चोरट्यांचा डल्ला मारला आहे. ९ लाख ८७ हजारहून अधिक रक्कमेवर चोरट्यांनी डल्ला मारला आहे. १० बनावट चेकच्या माध्यमातून वैद्यकीय अधिक्षकांच्या खोट्या सहीवरुन पैसे वळवले. डिसेंबर २०२३ ते फेब्रुवारी २०२४ दरम्यान रक्कम काढल्याचं समोर आले आहे. आझाद मैदान पोलीस ठाण्यात >>पान २

## ठाण्यात पुन्हा २ वर्षाच्या चिमुरडीचे अपहरण करुन लैंगिक अत्याचार

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी** : मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या घटना काही थांबण्याचं नाव घेत नाहीये. गेल्या सात महिन्यात २३३ अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचाराच्या घटना घडल्यात, त्यात 'पोक्सो' कायद्यानुसार गुन्हे दाखल करून नराधमांना अटक केली. खळबळजनक बाब म्हणजे काही दिवसांपूर्वी बदलापूर मधील एका शाळेत दोन चिमुकल्यांवर लैंगिक अत्याचार झाला होता. या घटनेनं संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली असताना अंगणात खेळत असलेल्या २ वर्षीय चिमुकलीचं अपहरण करुन निर्जनस्थळी नेऊन तिच्यावर ३५ वर्षीय नराधमानं लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

सात महिन्यात २३३ अल्पवयीन मुली नराधमांच्या भक्ष्यस्थानी



अपहरणासह लैंगिक अत्याचार – याप्रकरणी कल्याण ग्रामीण तालुका पोलीस ठाण्यात अपहरणसह लैंगिक अत्याचार आणि पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करत पोलिसांनी नराधमाला बेड्या ठोकल्या आहेत. पोलीस सूत्राने दिलेल्या माहितीनुसार, कल्याण तालुक्यातील एका गावात पीडित दोन वर्षाची चिमुरडी कुटुंबासह राहाते. तर ३५ वर्षीय नराधम आरोपी हा याच भागात राहतो. त्यातच पीडित चिमुकली गुरुवारच्या दिवशी दुपारच्या सुमारास घराबाहेरील अंगणात खेळत होती. त्याच सुमारास तिथे हा नराधम आला. त्यानं पीडितेचं अंगणातून अपहरण करत नजीकच्या निर्जनस्थळी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. >>पान २

## ''माझ्यावर बलात्कार...'', स्वप्ना पाटकर यांनी संजय राऊतांविरोधात ईडीला लिहिले पत्र

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) गटाचे खासदार संजय राऊत यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. पत्राचाळ जमीन घोटाळा प्रकरणातील



साक्षीदार स्वप्ना पाटकर यांनी ईडीला पत्र लिहिलं आहे. पत्राचाळ प्रकरणी पोलिसांना दिलेला जबाब बदलण्यासाठी संजय राऊत दबाव टाकत असल्याचा स्वप्ना पाटकर यांनी आरोप केला.आपल्या जीवाला धोका असल्याचं देखील त्यांनी पत्रात म्हटलंय. स्वप्ना पाटकर यांच्या आरोपानंतर आता पत्राचाळ प्रकरणी संजय राऊतांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

स्वप्ना पाटकर यांचा नेमका आरोप काय? : स्वप्ना पाटकर यांनी पत्रात >>पान २

# डॉ. ऋतुजा चव्हाणला वाढत आहे वयोवृद्धांचा पाठिंबा

दैनिक आपला विदर्भ

## नवीन व महिला आमदाराच हवी वयोवृद्धाने केल्या भावना व्यक्त, परिवर्तन होणे गरजेचे

**मेहकर/विशेष प्रतिनिधी** : मेहकर विधानसभा निवडणुकीमध्ये डॉक्टर ऋतुजा चव्हाण ह्या निवडणूक लढवणार असून त्या दृष्टीने त्यांनी खेड्यापाड्यांमध्ये आपला संपर्क वाढविला आहे संपर्क वाढवत असताना डॉक्टर ऋतुजा ताई यांनी भविष्यामध्ये राबविण्यात येणारे विविध उपक्रम गोरगरिबांच्या शेतकऱ्यांच्या समस्या या संदर्भात त्या जनतेशी संवाद साधत आहे त्याचबरोबर त्यांचे सहकारी कार्यकर्ते मुली महिलावर्ग ह्या सुद्धा ऋतुजा ताईसाठी जीवाच रान करत आहेत मेहकर विधानसभा मतदार संघातील प्रत्येक कुटुंबाला भेटी देऊन विचार विनिमय व त्यांना विश्वासात घेऊन निवडणुकीत उभे राहावे अथवा नाही जनतेचे मत किंवा जनतेच्या अपेक्षा काय आहेत हे ऋतुजा चव्हाण यांच्याकडून व त्यांच्या सहकार्याकडून चाचपणी अथवा कानोसा घेत आहे या दरम्यान एका गावामध्ये वयोवृद्ध असलेल्या मात्र राजकारणाची संपूर्ण माहिती असलेल्या व्यक्तीने आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले आहे की आता काहीतरी नवीन पाहिजेत महिला आमदार आवश्यक असून महिलांना समस्यांची जाण असते महिलावर्ग समस्या सोडविण्यासाठी जिद्द चिकाटी व मेहनत करतात ग्रामीण व शहरी भागातील समस्यांची महिलांना तंतोतंत माहिती असते त्यामुळे यावेळेस मेहकर मतदारसंघात परिवर्तनाची गरज असून महिला आमदारच असायला हव्या अशा भावना त्या वयोवृद्ध माणसाने व्यक्त केल्या आहेत त्यामुळे सध्या तरी डॉक्टर ऋतुजा चव्हाण यांना ग्रामीण भागात चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळत असून डॉ. ऋतुजा ताई ह्या प्रत्येक गावात जाऊन त्या गावातील समस्या अडीअडचणी यांची विचारपूस करत आहेत यावेळी त्या वयोवृद्धाने सांगितले की ताईने आमच्या गावात येऊन गावकऱ्यांना मार्गदर्शन केले पाहिजेत आम्ही सुद्धा आमच्या अडीअडचणी ऋतुजा



ताईंना सांगून त्यांना आमचा पाठिंबा नक्कीच देऊ जुन्याला लोक कंटाळले असून आता काहीतरी नवीन पाहिजेत अशा भावना सुद्धा वयोवृद्ध माणसाने व्यक्त केले आहेत डॉ.ऋतुजा चव्हाण यांना वाढता पाठिंबा पाहता विरोधकांमध्ये मात्र घबराटीचे वातावरण दिसून येत आहे अजून निवडणुका अडीच ते तीन महिन्यावर आहेत तोपर्यंत ऋतुजा चव्हाण मेहकर मतदार संघातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करत आहे व त्यांना चांगला



पाठिंबा सुद्धा मिळत आहे एक सर्वसामान्य कुटुंबातील व समस्यांची जाण असलेली महिला जर आमदार झाली तर मेहकर मतदार संघाचा नक्कीच विकासात्मक कायापालट झाल्याशिवाय राहणार नाही असेही बोलल्या जात आहे ऋतुजा चव्हाण यांच्यासाठी सर्व समाजातील लोक महिलावर्ग मुली स्वतः हून पुढाकार घेत असून गोरगरीब मतदारांशी संपर्क करत आहेत ऋतुजा चव्हाण यांना यावेळेस आमदार करण्यासाठी सर्व एकजुटीने काम करत असल्याचे दिसून येत असून डॉक्टर ऋतुजा ताईंना ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.

## विरोधक आंदोलनाचा आगडोंब उसळवितात...

सध्या महाराष्ट्र राज्यात आंदोलन आंदोलन नावाचा खेळ सुरू आहे. आंदोलनाचा बडगा उगारत आहेत. एका प्रकरणाची आग पेटविली जाते.. त्याचा धूर चारही दिशांना पसरविण्याचा प्रयत्न केला जातो न जातो तोच दुसरी एखादी नैसर्गिक आपत्ती का होईना घटना घडते आणि पहिली आग शांत होऊन दुसरा आगडोंब उठविला जातो. साधारणतः निवडणुका आल्या रे आल्या की सत्तापक्षाला अडचणीत पकडण्यासाठी विरोधकांकडून आंदोलन, नारे निदर्शन, बंद आदी अनेक हत्यारे उपसली जातात. बदलापूरमध्ये एक घटना घडली निश्चितच या घटनेचा निषेध व्हावा तितका थोडाच आहे. अशा घटनांमधील अपराध्यांना कठोरात कठोर शिक्षा दिली पाहिजे, ही तर सर्वसामान्य लोकांचीही मागणी होऊ शकते. ज्यांना मुली आहे ते तर अशा नराधमांना ठेचून काढा, अशीही मागणी करू शकतात. मात्र, अशा घटनांचे राजकीय भांडवल न करता सामोपचाराने, सर्वसंमतीने त्यावर उपाययोजना केल्या पाहिजे. हे न करता विरोधक आंदोलनाचा आगडोंब उसळवितात. या बदलापूर घटनेच्या निमित्ताने महाराष्ट्र बंदचे आवाहन करून विरोधातील महाविकास आघाडीने विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर सरकारविरोधी वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री लाडकी वहीण योजनेमुळे मोठ्या प्रमाणावर महिला वर्ग सत्तापक्षाकडे वळण्याचा अंदाज घेऊन त्यांच्या विरोधात वातावरण निर्माण करण्याचा विरोधकांचा डाव होता. लहान मुलीच सुरक्षित नाही तिथे लाडकी बहीण काय घेऊन बसलात, असे नरेटिव्हही। तयार झाले होते. मात्र, न्यायालयाने हा बंद अवैध ठरवून त्यांचा डाव उधळून लावला. तेव्हापासून विरोधक चांगलेव चवताळले आहेत. आता त्यांच्या हाती सिंधुदुर्ग किल्ल्याच्या पुतळ्याचे प्रकरण तागले आहे. तो पुतळा उभारण्याचे काम नौदलाने केले. मात्र, त्याचे खापर महाराष्ट्र शासनावर फोडले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्या पुतळ्याचे लोकार्पण झाल्यामुळे या घटनेची नैतिक जबाबदारी मोदी यानी घ्यावी आणि देशवासीयांची माफी मागावी, अशी मागणी केली जात आहे. जम्मू–काश्मीर आणि हरयाणा विधानसभेच्या निवडणुकांचा कार्यक्रम झाला असला, तरी इकडे महाराष्ट्रात त्याचे पडसाद उमटून विरोधक आंदोलनाचे हत्यार उपसून कामाला लागले आहेत. त्या तारखा जाहीर झाल्यामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांना अजूनही आंदोलनापासून फुरसत मिळालेली नाही. कोणत्या ना कोणत्या कारणाने हे आंदोलन हाती घेतले जात आहे. अजून महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झालेल्या नाहीत. एकूणच परिस्थिती पाहता राज्यातील महायुती सरकारनेही सावध व गरज पडल्यास आक्रमक भूमिका घेणे गरजेचे आहे. लोकसभा निवडणुकीच्या आधीही विरोधकाकडून देशभर असेच आदोलन पुकारण्यात आले होते त्यात प्रामुख्याने शेतकरी आंदोलन, शाहीनबाग आंदोलनाचा उल्लेख करता येईल. शेतकऱ्याच्या हिताचे कायदे असतानाही त्याला विरोध केला गेला. एवढेच नव्हे, तर ठिय्या आंदोलन करून सर्वसामान्यांचे हाल बेहाल करून टाकले होते. शाहीनबाग आंदोलनामुळे तर देशात जातीयवादाचा मोठा आगडोंब उसळण्याची शक्यता निर्माण झाली होती. शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने लाल किल्ल्यापर्यंत आंदोलनकर्त्यांनी मजल मारली होती. साधारणतः माझा असा अनुभव आहे की, देशात, राज्यात जेव्हा निवडणुका अपेक्षित असतात तेव्हा विरोधकाकडून आदोलनाचे शस्त्र पाजळले जात असते. त्यात सर्वसामान्यांच्या संपत्तीची मोठ्या प्रमाणावर हानी होत असते, कधी कधी तर अशी आंदोलने जीवावरही बेतत असतात. मात्र, त्यांचे कोणाला काही सोयरसुतक नसते, निव्वळ आपली पोळी भाजून घेणे, हाच त्या मागचा हेतू असतो. लोकांमध्ये सतापक्षाविरुद्ध जहर पसरविणे हाच त्या मागचा प्रमुख उद्देश असतो, सत्तापक्षाला सत्तेवरून हुसकावून लावून सत्ता बळकावणे अशी विरोधकांची अपेक्षा असते. येनकेनप्रकारेण सत्ता बळकाविणे, हे विरोधकाचे उद्दिष्ट असते. पाना सर्वसामान्यांच्या प्रश्नाशी त्यांच्या समस्या अडचणींशी काहीही देणे घेणे नसते बर हे मुन्हा सत्तेत आले तर जनसामान्यांसाठी काही करतात का? तर उत्तर आहे नाही... मात्र आंदोलनाचा दाह शांत झालेता असतो. एवढेच.....

# मेहकर येथे मातंग समाजाचा पार पडला निर्धार मेळावा

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** डॉ. जानु मानकर यांच्या नेतृत्वात मेहकर विधानसभे मध्ये कृषी वैभव लॉन येथे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने न भूतो न भविष्यती असा मतांग समाजाचा निर्धार मेळावा पार पडला.. महाविकास आघाडीच्या पदाधिकारी याच्या उपस्थितीत मातंग समाजाच्या उत्स्फूर्त प्रतिसादात महविकास आघाडीचे सरकार येण्यासाठी व उध्दव बाळासाहेब ठाकरे यांना पुन्हा मुखयमंत्री करन्यासाठी विधानसभेचा काण्या कोपऱ्यातुन समाज बांधव एकत्र येऊन निर्धार मेळावा मोठ्या थाटा माटात पार पडला या निर्धार मेळाव्याचे आयोजन डॉ. जानु मानकर यांनी केले असुन अध्यक्ष स्थानी सचिन भाऊ साठे शिवसेना स्टार प्रचारक हे होते तर प्रमुख उस्थिती म्हणुन विजयजी अभोरे राज्य उपाध्यक्ष कॉंग्रेस कमेटी, छगन मेहत्रे शिवसेना सह संपर्कप्रमुख, आशिष जी राहटे, उपजिल्हाप्रमुख, जिजाबाई राठोड जिल्हाप्रमुख महिला आघाडी,, नंदू भाऊ कराळे जिल्हाप्रमुख युवासेना , साहेबराव पाटोळे, माजी नगराध्यक्ष लोणार, कैलास जी खंडारे, प्रदेशाध्यक्ष लहुजी शक्ती सेना, संजय भाऊ बोदडे, संस्थापक अध्यक्ष मातंग समाज समन्वय समिती महाराष्ट्र राज्य,






तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, शहर प्रमुख गजानन जाधव लोणार, गोपाल बचीरे, जिल्हा संघटक, साहेबराव सरदार, राष्ट्रवादी नेते, व आदी मान्यवर हे उपस्थित होते. मेहकर व लोणार येथील शेकडो शिवसैनिक कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजेंद्र माने यांनी केले तर प्रास्ताविक भाषणात डॉक्टर जे जे मानकर यांनी मातंग समाजाचा संपूर्ण इतिहास व आताची परिस्थिती याची मांडणी केली देशातील महायुतीचे सरकार हे किती धोकादायक असून त्यांनी खोट्या हिंदुत्वाचा प्रचार करून सत्ता स्थापन केली व येथील दलित व अल्पसंख्यांकांवर अन्याय केला याची मांडणी केली या देशात हुकूमशाही ची रंगीत तालीम सुरु असून मतदारांना कसं खोट्या हिंदुत्वाने भुरळ पाडल्या जात आहे आमचे हिंदुत्व हे राष्ट्रीयत्व असून घरातील चूल पेटवणार आहे घर जाळणार नाही ही उद्धव साहेबांची भूमिका समजासमोर मांडली,मेहकर विधानसभा ही अनुसूचित जातीसाठी राखीव असून ते रिझर्वेशन अनुसूचित जातीच्या नसलेल्या उमेदवाराने कसे लाटले व आपल्या हक्काचं आरक्षण कसं हिसकावून घेतलं आता येणाऱ्या विधानसभेत या गद्दारांना मातीत गाडल्याशिवाय मातंग समाज गप्प बसणार नाही व येणाऱ्या विधानसभेत महाविकास आघाडीचे सर्वच उमेदवार निवडून आणून उद्धव साहेब ठाकरे यांना मुख्यमंत्री करण्यासाठी हा निर्धार मेळावा आयोजित केला असल्याचे स्पष्ट केले.

कैलास जी खंदारे यांनी मातंग समाजावर दिवसेंदिवस कसा अत्याचार वाढत चालला असून त्यासाठी यावेळेस मातंग समाजाला मेहकर विधानसभेतून उमेदवारी मिळावी ही आशा व्यक्त केली तर सचिन भाऊ साठे यांनी एवढ्या मोठ्या निर्धार मेळाव्यास एकही मोठा शिवसेनेचा नेता उपस्थित राहिला नसल्याने व जिल्हा नेते सुद्धा उपस्थित नसल्याने खंत व्यक्त केली मातंग समाज संपूर्ण ताकतीनिशी शिवसेने सोबत असून शिवसेनेला सुद्धा या समाजाची दखल घेणे अपेक्षित आहे असे आपल्या अध्यक्षीय भाषणातून आशा व्यक्त केली, आशिष जी रहाटे यांनी मताच्या विभागणीमुळे लोकसभेत कसा आपल्याला पराभव स्वीकारावा लागला याचे स्पष्टीकरण दिले तर येणाऱ्या विधानसभेत कुठलेही मताचं विभाजन न होता महाविकास आघाडीला भरघोस मतांनी निवडून देण्याचे आवाहन केले. विजय जी अंभोरे यांनी आपल्या समाजातून कुठलीही बंडाळी होणार नाही याची ग्वाही दिली उमेदवार कोणीही असो यावेळी आमदार हा महाविकास आघाडीचाच असेल असा विश्र्वास व्यक्त केला. छगन जी मेहेत्रे यांनी हिंदू संस्कृतीमध्ये मातंग समाजाची महत्त्वपूर्ण भूमिका असून मातंग समाजाला न्याय मिळावा यासाठी मी प्रयत्नशील राहील असे प्रतिपादन केले, साहेबराव सरदार यांनी अनुसूचित जातीचा नसलेला आमदार आज पंधरा वर्षे झाले इथला आरक्षण लाटून संपूर्ण अनुसूचित जातीवर अन्याय करतो आहे व न्यायव्यवस्थेची दिशाभूल करतो आहे तरीही आपण अशा गद्दार आमदारालाच निवडून देतो आहे यावेळेस तरी या विधानसभेला या आमदाराला त्याची जागा दाखवा आमदार कोणीही झाला तरीही चालेल परंतु तो अनुसूचित जातीचाच असावा असे मत व्यक्त केले, साहेबराव पाटोळे यांनी यावेळेस पक्ष कुठलाही असो परंतु उमेदवारी मातंग समाजाला मिळावी हा मोलाचा संदेश देऊन कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले

डॉक्टर जानू मानकर यांनी आपल्या खास शैलीत विरोधकांचा समाचार घेऊन यावेळेस इथल्या प्रस्थापित खोटारड्या आपल्या ताटातून आरक्षण हिसकावून घेणाऱ्या गद्दाराला यावेळेस मातंग समाज पुढाकार घेऊन मातीत गाडल्याशिवाय राहणार नाही असा निर्धार व्यक्त केला

या कार्यक्रमासाठी युवा सेनेचे मेहकर तालुकाप्रमुख आकाश घोडे, लोणार तालुकाप्रमुख जीवन घायाळ, लोणार शहर अधिकारी श्रीकांत मदनकर, किसान सेनेचे उपजिल्हाप्रमुख नारायण बळी, विभाग प्रमुख राजू बुधवत, विजय मोरे, संतोष लाड, पंडितराव देशमुख, साहेबराव हिवाळे, श्रीकांत नागरे, व इतर शेकडो शिवसैनिक व महाविकास आघाडीचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

या कार्यक्रमामुळे विधानसभेचे वारेच पलटून गेल्यासारखं चित्र निर्माण झालं असून येणाऱ्या विधानसभेत मातंग समाजाच्या या निर्धार मेळाव्याचे रूपांतरण राजकीय बदलात होणार हे मात्र नक्की दिसून आले, या निर्धार मेळाव्यासाठी सर्वच सर्कल मधून मातंग समाजाच्या असंख्य कार्यकर्त्यांनी आपल्या जीवाचे रान करून हा निर्धार मेळावा यशस्वी केला त्यामध्ये शिवसैनिकांचा सिंहाचा वाटा होता.

पान १ वरून...

## गोमांस खाल्ल्याच्या

तेव्हा त्याला जबरदस्त मारहाण केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या प्रकरणात दोन किशोरवयीन मुलांचाही समावेश आहे. जेव्हा साबिर मलिकला मारहाण करण्यात आली तेव्हा काही माणसं मधे पडली त्यानंतर या लोकांनी साबिरला सोडलं आणि तो थोडा पुढे गेल्यावर त्याला त्या परिसरात गाठले आणि तिथेही मारहाण केली. या प्रकरणात एकूण पाच जणांना अटक करण्यात आली आहे. तर दोन किशोरवयीन मुलांचाही समावेश आहे.

प्रत्यक्षदर्शींनी काय सांगितले?

या घटनेबाबत प्रत्यक्षदर्शी म्हणाले की साबिर मलिकला ते लोक मारत होते, त्या सगळ्यांनी त्याला मारहाण केली. साबिर मलिक बाबत पोलीस म्हणाले की तो प्लास्टिकच्या बाटल्या गोळा करुन त्या भंगारमध्ये विकायचा आणि त्याचा चरितार्थ चालवत होता. आता त्याची हत्या करण्यात आली आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या आधारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मागच्या दहा वर्षापासून हरियाणात या प्रकारे हत्या करण्याचे आणि मॉब लिंचिंग करण्याचे प्रकार वाढले आहेत. २०२३ मध्ये दोन मुस्लिम माणसांना कारमध्ये बसवून जाळण्यात आल्याची घटना घडली होती. आता एका मुस्लिम मजुराला बोलवून त्याची हत्या करण्यात आली आहे.

## जन आरोग्य योजनेच्या

७ जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, जी टी रुग्णालयात गरीबांसाठी चालवल्या जाणाऱ्या महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या रकमेवर चोरट्यांनी डल्ला मारला. बनावट चेकच्या माध्यमातून रुग्णालयाच्या वैद्यकिय अधिक्षक यांच्या खोट्या स्वाक्षरीकरून हे पैसे सात जणांच्या खात्यावर वळवण्यात आल्याचे प्रथमदर्शी समोर आले आहे. डिसेंबर २०२३ ते फेब्रुवारी २०२४ दरम्यान ही रक्कम काढण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. एकाच नंबरचे चेक दोन वेगवेगळ्या खात्यावर वटवण्यात आल्याने ही बाब आली समोर आली आहे. मुंबईच्या आझाद मैदान पोलिस ठाण्यात ७ आरोपींच्या विरोधात कलम ४२०, ४६५,४६७,४६८,४७१,४७४, १२० (ब), ३४ भारतीय दंड सहिता १८६० कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

## ठाण्यात पुन्हा २ वर्षाच्या

धक्कादायक प्रकार – अत्याचारानंतर नराधम घटनास्थळावरच चिमुकलीला सोडून फरार झाला होता. दुसरीकडे नराधमाच्या लैंगिक अत्याचारामुळ वेदना असह्य झाल्यानंतर चिमुकली रडत रडत घरी आली. ती रडत असल्याचे पाहून आई–वडिलांनी तिला विचारण्याचा प्रयत्न केला. मात्र लहान असल्याने ती काहीच सांगू शकली नाही. त्यामुळे कुटुंबाला संशय आल्याने चिमुकलीच्या अंगावर कुठे दुखापत झाली तर नसावी, असा संशय कुटुंबीयांना आला. त्यांनी तिची पाहणी केली असता घडलेला धक्कादायक प्रकार लक्षात आला.

नराधमावर गुन्हा दाखल – आई–वडिलांनी तातडीनं कल्याण ग्रामीण तालुका पोलिसात धाव घेत नराधमावर गुन्हा दाखल केला. पोलिसांनी घटनेचं गांभीर्य ओळखून तपासाची चक्रं फिरवत नराधम आरोपीला आज ३१ ऑगस्टला (आज) पहाटेच्या सुमारास ताब्यात घेऊन अटक केली आहे. या संदर्भात वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांच्याशी संपर्क साधला असता, ३५ वर्षीय आरोपीचा शोध घेऊन त्याला कल्याण तालुक्यातील एका गावातून अटक केली आहे. आज (शनिवारी) दुपारच्या सुमारास त्याला कल्याण जिल्हा सत्र न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ठाणे ठरतंय अल्पवयीन बालिकांसाठी धोक्याचे – दुसरीकडे सूत्राने दिलेल्या माहितीनुसार मुख्यमंर्त्याच्या जिल्ह्यात ठाणे शहर पोलीस आयुक्तांच्या हद्दीतील पाच पोलीस उपआयुक्त कार्यालयाच्या हद्दीत ३५ पोलीस ठाणी आहेत. या विविध पोलीस ठाण्यात या गेल्या सात महिन्यात २३३ अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचाराच्या घटना घडून पोक्सो कायद्यानुसार गुन्हे दाखल करत आरोपी नराधमांना बेड्या ठोकल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक कल्याण पोलीस परिमंडळ तीन मध्ये ६१ पोक्सोचे गुन्हे तर त्या खालोखाल उल्हासनगर पोलीस परिमंडळ ४ मध्ये ५५, भिवंडी परिमंडळ २ मध्ये ४८ तर ठाणे शहरातील १ आणि ५ या दोन्ही परिमंडळ ४३, आणि २६ असे गुन्हे दाखल असल्याचे आकडेवारीवरुन समोर आले आहे.

## माझ्यावर बलात्कार...,

संजय राऊत यांचे नाव स्पष्टपणे घेतले आहे. ईडीच्या पश्चिम विभागाच्या अतिरिक्त संचालकांना हे पत्र लिहिलं त्यांनी लिहिलं आहे. ज्यामध्ये असं म्हटलं आहे की, ''पत्राचाळ प्रकरणातील आरोपी आणि त्यांचे गुंड मला सतत धमकावत आहेत. माझ्यावर बलात्कार केला जाईल, अशीही धमकी दिली जात आहे. इतर साक्षीदारांनाही अशाच प्रकारे धमक्या दिल्या जाण्याची शक्यता आहे. माझा जबाब बदलण्यासाठी माझ्यावर दबाव निर्माण केला जात असून, या प्रकरणातील आरोपी संजय राऊत आणि त्याच्या कुटुंबीयांवर नोंदवलेले आरोप बदलण्यासाठी हा दबाव निर्माण केला जात आहे.''

काय आहे पत्राचाळ जमीन घोटाळा? : पत्रा चाळ जमिनीचा कथित घोटाळा २००७ पासून सुरू झाला. २००७ मध्ये म्हाडानं (महाराष्ट्र गृहनिर्माण व विकास प्राधिकरण) पत्रा चाळच्या पुनर्विकासाचं काम गुरु आशिष कन्स्ट्रक्शन कंपनीला दिलं होतं. गोरेगावच्या सिद्धार्थनगरमध्ये हा पुनर्विकास होणार होता. म्हाडाच्या ४७ एकर जमिनीवर एकूण ६७२ घरं बांधण्यात आली आहेत. पुनर्विकासानंतर साडेतीन हजारांहून अधिक सदनिका बांधून गुरू आशिष कंपनीला देण्यात येणार होत्या. म्हाडासाठी सदनिका बांधल्यानंतर उर्वरित जमीन खासगी विकासकांना विकायची होती. १४ वर्षांनंतरही कंपनीनं सदनिका बांधून लोकांना पुरवल्या नसल्याचा आरोप आहे. या सर्व घोटाळ्याचा तपास ईडी करत असून त्या प्रकरणात स्वप्ना पाटकर या साक्षीदार आहेत.

## नोटबंदीच्या काळातील २५ कोटी २७ लाखांच्या नोटा जिल्हा बँकेत पडून, तातडीने बदलून द्याव्या; हसन मुश्रीफांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** नोटबंदीच्या काळातील नोटा आणि नाबार्डने चुकीच्या पद्धतीने अनेक शेतकऱ्यांची अपात्र ठरविलेली कर्जमाफी या संदर्भात आपण केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्याकडे न्याय मागणार असल्याचे मंत्री हसन मुश्रीफ यांनी म्हटलंय. नोट बंदीच्या काळातील २५ कोटी २७ लाखाच्या नोटा कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेकडे पडून आहेत, त्या नोटा रिझर्व बँकेने तातडीने बदलून द्यायला हव्यात, अशी मागणी मंत्री हसन मुश्रीफ यांनी केलीय. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ८६ व्या सर्वसाधारण सभेत हसन मुश्रीफ बोलत होते. यावेळी कॉंग्रेस नेते सतेज पाटील, भाजप नेते अमल महाडिक, शिंदेंच्या शिवसेनेचे नेते संजय मंडलिक उपस्थित होते.

हसन मुश्रीफ म्हणाले, इतकंच नव्हे तर नाबार्डने चुकीच्या पद्धतीने अनेक शेतकऱ्यांची कर्जमाफी अपात्र ठरविली आहेत. या संदर्भात कोल्हापूर जिल्हा बँकेने उच्च न्यायालयात दाद मागितली. तिथं आपल्याला न्याय मिळाला पण नाबार्डने पुन्हा सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केल्यामुळे कोल्हापूर जिल्हा बँकेचे जवळपास दोन अडीच कोटी रुपये खर्च झाले आहेत, असंही मुश्रीफ यांनी बोलून दाखवलं.

हसन मुश्रीफ म्हणाले, तानाजी सावंत मुक्त विद्यापीठ आहेत. अशा वक्तव्यामुळे महायुतीत गैरविश्र्वासाचे वातावरण तयार होते. त्यामुळे त्यांना मुख्यमंत्र्यांनी समज देण्याची गरज आहे. त्यांची अनेक अशी वक्तव्ये आहेत, निवडणुकीच्या तोंडावर आपल्याबद्दल वाईट संदेश जात असेल तर मुख्यमंत्र्यांनी गांभीर्याने हा विषय घेण्याची गरज आहे.

# मुख्यमंत्री च्या नगरविकास विभागातील कर्मचाऱ्यांचे आंदोलन

### राज्यातील सर्व नगर पालिका कर्मचारी जाणार बेमुदत संपावर

### ४ तारखेपासून नगरपालिकेतील अत्यावश्यक सेवेचे अधिकारी कर्मचारी संपात होणार सहभागी

### जनतेला होणाऱ्या त्रासाला मुख्यमंत्री राहणार जबाबदार

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार :** केंद्र सरकारच्या धरतीवर राज्य सरकारने ही राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना णझड योजना लागू करण्याबाबत घोषणा केलेली असल्यामुळे राज्यातील बहुसंख्य कर्मचारी अधिकारी संघटनांनी कामबंद आंदोलन स्थगित केलेले आहे..

परंतु मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे असलेल्या नगर विकास विभागातील महाराष्ट्र राज्य नगर परिषद संवर्ग अधिकार्यांना शासनाच्या अधिनियमानुसार राज्य शासकीय कर्मचारी म्हणून दर्जा दिलेला आहे... त्यास नगर विकास विभागाने सुद्धा दुजोरा दिलेला आहे.. त्यानुसार सदर अधिकाऱ्यांना सेवार्थ आयडी देणे बाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे गेला असता वित्त विभागाने सदर अधिकारी शासकीय कर्मचारी नसल्याबाबतची तृटी काढून राज्यातील अंदाजे ३००० संवर्ग अधिकार्यांना सेवार्थ आयडी पासून वंचित ठेवले आहे.

सदर अधिकाऱ्यांपैकी बरेच अधिकारी २०१०– २०१२ पासून कार्यरत असून अद्याप पर्यंत त्यांना जुनी पेन्शन/ नवी पेन्शन यापैकी कुठल्याही पेन्शन योजनेची अंमलबजावणी झालेली नाही .. याच सोबत नगरपरिषदचे स्थानिक कर्मचारी यांना सुद्धा पेन्शन लागू नाही... यामुळे या सर्व अधिकाऱ्यांच्या कुटुंबांचे भवितव्य अंधकारात असल्यामुळे महाराष्ट्र राज्य नगर परिषद संवर्ग अधिकारी संघटनेने आपले काम बंद आंदोलन स्थगित न करता सेवार्थसह पेन्शन योजनेचे पर्याय दिल्याशिवाय बेमुदत काम बंद आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असे ठरवलेले आहे... त्यानुसार मलकापूर नगरपरिषद कार्यालयातील सर्व संवर्ग अधिकाऱ्यांनी १००% काम बंद आंदोलन केले..

आंदोलनास महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी व संवर्ग अधिकारी संघटना मलकापूर, अखिल भारतीय सफाई मजदूर कॉंग्रेस मलकापूर यांनी सुद्धा संपूर्ण पाठिंबा दिलेला आहे... जर ३ तारखेपर्यंत मागण्या



मंजूर केल्या नाही, तर राज्यातील सर्व नगरपालिका महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असल्याचा इशारा संवर्ग अधिकारी संघटनेच्या वतीने देण्यात आलाय... यामध्ये अत्यवश्यक सेवेचे अधिकारी व कर्मचारी सुद्धा सहभागी होणार असल्याने जनतेला होणाऱ्या त्रासाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे जबाबदार राहतील, असा ईशारा देण्यात आलाय..

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### बऱ्हाणपूर अंकलेश्वर महामार्गवर रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमध्ये राष्ट्रवादीच्या वतीने खिचडी बनवून अनोखे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**बऱ्हाणपूर/प्रतिनिधी** : बऱ्हाणपूर अंकलेश्वर महामार्गावरील खड्ड्यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या माध्यमातून खड्ड्यांमध्ये खिचडी बनवून निषेध करीत अनोख आंदोलन करण्यात आले. बऱ्हाणपूर अंकलेश्र्वर महामार्गावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडलेले आहेत आणि त्या खड्ड्यांमुळे नागरिकांना लहान मोठा अपघातातून जावं लागत आहे. या रस्त्यावर निधी देखील खर्च करण्यात आलेला आहे. परंतु पावसामुळे ते खड्डे पुन्हा निर्माण झाल्याने वाहन चालकांना वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागते. त्यासाठी आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने महिला पदाधिकारी ज्योती पावरा यांच्या नेतृत्वाखाली खड्ड्यात खिचडी बनवून निषेध करण्यात आला. जोपर्यंत या रस्त्यावरील खड्डे दुरुस्त होत नाही आणि शासन चोपडा तालुक्यातील जनतेकडे लक्ष देत नाही. तोपर्यंत आंदोलन सुरू राहील. येणाऱ्या कालावधीमध्ये हे रस्त्यावरील खड्डे बुजले गेले नाही तर मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडण्यात येईल, असे देखील ज्योती पावरा यांनी सांगितले.

### भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांची पत्रकार परिषद




दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी** :महाविकास आघाडीचे नेते जे उद्या जोडे मारो आंदोलन करणार आहेत ते पंडित जवाहरलाल नेहरू, सोनिया गांधी,राहुल गांधी यांना जोडे मारणार का कारण यापूर्वी देखील त्यांच्याकडून जे काही देशातील स्वतंत्र सैनिक असतील किंवा महत्त्वाच्या व्यक्ती असतील त्यांचा अवमान झाला. त्यानंतर त्यांनी देखील माफी मागितली होती त्याचप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माफी मागितल्यानंतर सुद्धा जर ही लोक जोडे मारो आंदोलन करणार असतील तर त्यांनी पहिले त्यांच्या स्वतःच्या वरिष्ठ नेत्यांना जोडे मारावे – केशव उपाध्ये यांनी ठाण्यात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत पत्रकारांशी बोलताना सांगितले.

### डॉ. अंकुश देवकर यांचा शिंदे शिवसेनेत प्रवेश



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : अशोकराव चव्हाण यांचे म्हणून खंदे समर्थक म्हणून ओळख असलेले व नांदेडच्या वैद्यकीय क्षेत्रात ख्याती असेल डॉक्टर अंकुश देवसरकर यांनी शेकडो समर्थकांसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थित मुंबईत शिवसेनेत प्रवेश केला. आज त्यांचे नांदेड येथे आगमन झाल्यानंतर जंगी स्वागत करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कामाला प्रभावित होऊन मी शिवसेनेत प्रवेश केला आहे, पक्षाची जबाबदारी दिली ते काम मी पार पाडेल, असं ही डॉ. अंकुश देवसरकर म्हणाले. ते हदगाव–हिमायतनगर मतदारसंघातून तयारी करताना पाहायला मिळत आहेत. विधानसभा निवडणुकीत ते शिंदे गटाकडून हदगाव हिमायतनगर मतदारसंघात दावा करण्याची शक्यता आहे.

### दुर्दैवाने राष्ट्रवादी कॉंग्रेसशी युती, म्हणणाऱ्या गणेश हाकेंना स्वत: अजित पवारांनी दिले प्रत्युत्तर

**मुंबई/प्रतिनिधी**: शिवसेनेचे मंत्री तानाजी सावंत यांच्यानंतर भाजपाच्या नेत्यांनीही अजित पवारांशी केलेल्या युतीबाबत नाराजी व्यक्त केली आहे. दुर्दैवाने अजित पवारांच्या गटाशी युती झालीय, असं भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेश हाके म्हणाले आहेत. यावर अमोल मिटकरी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांना कवडीचीही किंमत देत नाही असं अमोल मिटकरी म्हणाले आहेत. तसंच गणेश चतुर्थीच्या आधीच आपलं विसर्जन होणार नाही याची काळजी हाकेंनी घ्यावी असा टोलाही लगावला आहे. दुर्दैवाने अजित पवारांच्या गटाशी युती झाली आहे. पण ही युती ना त्यांना पटली, ना आम्हाला पटली. अजित पवार गटाशी युती म्हणजे असंगाशी संग असे आहे असे गणेश हाके म्हणाले. अजित पवार गटाने युती धर्म पाळला का? अशी विचारणा करताना भाजपच्या खासदाराला पाडल्याचाही आरोप हाकेंनी अजित पवार गटावर केला आहे.

# ढोल ताशांच्या गजरात, बाप्पाचे ठाणे नगरीत आगमन, वृंदावनच्या राजाचे जल्लोषात स्वागत

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी** : ढोल ताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या जोरदार आतषबाजीत वृंदावनच्या राजाचे मोठ्या थाटात आगमन झाले. तब्बल १५ फूट उंच अशा या बाप्पाचे भव्य रूपाचे पहिले दर्शन डोळ्यात साठवून घेण्यासाठी बाप्पाच्या भक्तांनी अलोट गर्दी केली होती.

गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया ' सर्वांच्या आवडत्या बाप्पाच्या आगमनासाठी आता केवळ काही दिवसांचा अवधी उरलेला असताना गणेश भक्तांना बाप्पांच्या दर्शनाची आस लागून राहिली आहे. सर्वच





गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांची मोठी लगबग दिसून येत आहे. गणपतीचे मंडपात कार्यकर्ते रात्रीचा दिवस करून आपल्या बाप्पाच्या आगमनाची तयारी करताना दिसत आहेत. बाप्पाची आरास लवकरात लवकर तयार करून त्या बाप्पा विराजमान करण्यासाठी लवकरच मुर्त्या आणून ठेवल्या जातात. वृंदावन सोसायटी येथील वृंदावन च्या राजाचे देखील मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले.

ढोल ताशांचा दणदणाट आणि फटाक्यांच्या जोरदार आतषबाजी मध्ये बाप्पाचे मोठ्या जल्लोषात आगमन झाले. वृंदावन गणेशोत्सव मंडळाचे यावर्षी ३८ वे वर्ष असून सुप्रसिद्ध मूर्तिकार खातू यांच्या कारखान्यातून ही गणेशाची अत्यंत सुंदर अशी मूर्ती बनवून घेतली आहे. तब्बल १५ फूट उंच असलेली मूर्ती प्रभू रामाच्या रूपात असून प्लास्टर ऑफ पॅरिस पासून बनलेली आहे. एका विशिष्ट ट्रॉलीवरून या मूर्तीने परेल पासून आपला प्रवास पहाटे पाच वाजता सुरू केल्यावर तब्बल १४ तासांचा प्रवास करून सायंकाळी सात वाजता बापाचं वृंदावन सोसायटीमध्ये आगमन झाले.

बाप्पाच्या आगमनासाठी आजूबाजूच्या तब्बल १०० हुन अधिक इमारतींमधले गणेश भक्त उपस्थित होते. प्रथम बाप्पाला एका कपड्यामध्ये झाकून आणले व जोरदार आतषबाजी करत कपडा दूर करून बाप्पाचे नयनरम्य रूप भाविकांसाठी उघडे करण्यात आले. बाप्पाच्या आगमनाची सलामी देण्यासाठी मुंबईचे सुप्रसिद्ध ढोल ताशा पथक यावेळी आपल्या शेकडो वादकांसह उपस्थित होते.

वृंदावन सोसायटीच्या गणेशोत्सवाचे यावर्षीची विशेष बाब म्हणजे गणेश मंडळाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते हे प्रामुख्याने तरुण मंडळी असून या स्वागत यात्रेमध्ये तरुणींचा देखील मोठा सहभाग बघायला मिळत होता. वृंदावनच्या बाप्पाचा मुक्काम दहा दिवसांचा असणार असून सर्वांनी बाप्पांच्या दर्शनाला आवर्जून यावे असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष सुमित सुर्वे यांनी केले.

## चाकूच्या धाकावर बाजारात व्यापाऱ्यास लुटले; मालेगावातील घटना

दैनिक आपला विदर्भ

■ प्रकाश भुरे

**मालेगाव:** मालेगाव शहरातील आठवडी बाजारातील कपडा व्यावसायिक युवकाला दोन युवकांनी चाकू व चैन चा धाक दाखवीत कपडा व्यवसायिक कृष्णा अनिल वळसे यांच्या जवळील तीन हजार पाचशे रुपये लुटून पोबारा केला ही घटना से सकाळी अकरा वाजता च्या दरम्यान शहरातील आठवडी बाजारातील तहसील मार्गावर घडली याप्रकरणी पोलिसांनी यातील दोन आरोपी रा गांधीनगर मालेगाव यांना अटक केली या संदर्भात कृष्णा अनिल वळसे यांनी पोलीसात दिलेल्या फिर्यादीनुसार फिर्यादी नेहमीप्रमाणे त्याचे कृष्णा ड्रेसेस या दुकानावर येऊन दुकान उघडून साफसफाई करीत असताना तेथे दोघे जन आले यावेळी एकाच्या याच्या हाती चाकू तर एकाच्या हातात टू व्हीलर ची चैन होती त्यांनी चाकूचा धाक दाखवीत फिर्यादीची कॉलर पकडून झटापट करुन फिर्यादीच्या खिशातील ३ हजार ५०० रुपये काढून घेतले यावेळी आरडाओरडा केल्याने बाजूचे दुकानदार हे मदतीला धावून आले यावेळी हे दोन्ही आरोपींनी तिथून पोबारा केला यानंतर दोन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली दरम्यान मागील काही दिवसात असे छोटे मोठे आणि घटना घडत असून टोळी युद्धासारख्या गटात हाणामारी करीत शहरात दहशत करण्याचा प्रयत्न होत असल्याने नागरिक भयभीत झाले आहेत दोन्ही आरोपी विरुद्ध कलम ३०९ ( ४)३ (५) न्याय संहिता नुसार गुन्हा दाखल केला आहे पुढील तपास ठाणेदार संजय चौधरी यांच्या मार्गदशना खाली पीएसआय राहुल गंधे हे करीत आहे

### कंगना रणौतने पुन्हा एकदा रणबीर कपूरवर साधला निशाणा

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेत्री कंगना रणौत आणि वादग्रस्त यांच्यात जुने नाते आहे. सक्रिय राजकारणात आल्यानंतरही ती अनेकदा वादग्रस्त विधान करताना दिसते. शेतकऱ्यांवर केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे आणि 'इमर्जन्सी' चित्रपटामुळे कंगना सध्या चर्चेत आहे.

## १९९३ साखळी बॉम्बस्फोट प्रकरण, मेमनच्या कुटुंबाची मालमत्ता केंद्राकडे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** मुंबईत १९९३ साली झालेल्या साखळी बॉम्बस्फोट खटल्यातील प्रमुख आरोपी टायगर मेमन आणि त्याच्या कुटुंबीयांशी संबंधित माहीम येथील अल हुसैनी इमारतीतील तीन सदनिका केंद्र सरकारच्या ताब्यात देण्याचे आदेश विशेष टाडा न्यायालयाने दिले आहेत. त्याचप्रमाणे, न्यायालयाने मालमत्ता जप्तीचा आदेशही रद्द केला. आतापर्यंत ही मालमत्ता मुंबई उच्च न्यायालयाच्या अखत्यारीत होती. अल हुसैनी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सचिवांनी या तीन मालमत्ता जप्त करण्यासाठी, दुरुस्ती आणि देखभालीची देय रक्कम, मालमत्ता कर आणि इतर खर्चासाठी व्याजासह ४१.४६ लाख रुपयांची मदत मागितली होती. तसेच, या मालमत्तेबाबत पुनर्विकास करारनामा करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणीही सोसायटीने केली होती. मात्र, विशेष न्यायालयाने ही मागणी फेटाळली व मालमत्ता केंद्र सरकारच्या ताब्यात देण्याचे आदेश दिले.माहीममधील अल हुसैनी सहकारी गृहनिर्माण संस्थेची मालमत्ता तस्करी विरोधी आणि विदेशी चलन अफरातफर (मालमत्तेची जप्ती) कायद्यांतर्गत (सफेमा) जप्त केली होती. टायगर मेमनच्या कुटुंबीयांकडे इमारतीत २२, २५ आणि २६ क्रमांकाच्या तीन सदनिका होत्या, त्यातील एक सदनिका टायगरची आई हनीफा मेमन हिच्या नावावर होती.

हनीफा हिची प्रकरणातून निर्दोष सुटाका झाली होती व नंतर तिचा मृत्यू झाला. तर, टायगरची वहिनी रुबिना मेमन हिच्या नावावर एक सदनिका होती, रुबिना हिला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली असून टायगरची पत्नी शबाना हिच्या नावावर तिसरी सदनिका होती. तिचा फरारी आरोपींच्या यादीत समावेश आहे. ही मालमत्ता १९९४ मध्ये टाडा अंतर्गत जप्त करण्यात आली होती. त्यानंतर, ती उच्च न्यायालयाच्या महानिबंधक कार्यालयाकडे वर्ग करण्यात आली. टायगर याचा भाऊ याकूब मेमन याला या प्रकरणी फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती. त्यानंतर, २०१५ मध्ये त्याला फाशी देण्यात आली.

## पोळा सणानिमित्त बाजारपेठा सज्ज

### महागाईचे सावट साहित्याचे दरवाढले शेतकरी चिंतेत

दैनिक आपला विदर्भ

■ प्रकाश भुरे

**मालेगाव** : शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असलेला बैलपोळा सण तोंडावर येऊन ठेपला आहे पोळ्याच्या तोंडावर दुष्काळी परिस्थिती दिसत आहे पावसामुळे शेतकरी जेरीस आले आहे निंदण, फवारणीत हातचा पैसा निघून गेला त्यात महागाई वाढतीवर आहे त्यामुळे पोळ्यावर महागाईचे सावट पसरले असून सण कसा साजरा करावा या चिंतेत बळीराजा सापडला आहे पोळा सण अवघ्या तीन दिवसांवर आला असल्यामुळे साहित्य खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांची बाजारात लगबग




वाढली असली तरी साहित्य खरेदी करताना शेतकऱ्यांकडून हात आखडता घेतला जात आहे बाजारात साहित्याचे दर वाढले आहेत पोळ्यात बैलांना सजविण्यात येते मात्र साज साहित्याचे भाव वाढले आहे त्यामुळे खरेदीकडे सध्या शेतकऱ्यांनी पाठ फिरविली आहे पोळा हा बळीराजासाठी महत्त्वाचा सण असतो लेकराप्रमाणे जपलेल्या बैलांना या दिवशी सजवून पोळ्यात घेऊन जातात सर्जा–राजाला सजविण्यासाठी विविध साहित्य लागते त्यात रंगीबेरंगी कासरे सव्वाशे रुपयांपर्यंत तर बिकनी गाडे ५० रुपये बाशिंग जोडी ११० ते ५०० रुपये, वेसन ७५ ते ९० रुपये दराने विकली जात आहे गोडें झुल्यासाठी १५० रुपये तोडे व घुंगरे ५०० रुपये जोडीवर पोहोचली आहे सोबत पेपर गेरू ऑइल पेंट आर्दीचे दर वाढले आहे भाव दुप्पट झाल्याने शेतकऱ्यांचा पोळा महागाईच्या विळख्यात सापडला असल्याची भावना शेतकऱ्यांतून व्यक्त होऊ लागली आहे

## कोथिंबिरीला उच्चांकी भाव, किरकोळ बाजारात ६० ते ८० रुपये दर

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी**: संततधार पावसामुळे पालेभाज्यांना फटका बसला आहे. लागवड कमी झाल्याने कोथिंबीर, मेथी, पालकासह सर्व पालेभाज्यांची आवक कमी प्रमाणावर होत आहे. कोथिंबिरीसह मेथी, पालक या पालेभाज्यांना उच्चांकी दर मिळाला आहे. किरकोळ बाजारात प्रतवारीनुसार कोथिंबिरीच्या एका जुडीला ६० ते ८० रुपये दर मिळाला आहे. मेथी जुडीला ५० रुपये दर मिळाला असून, पालकही तेजीत आहे.

पुणे विभागात पावसाची संततधार आहे. पावसामुळे पालेभाज्यांच्या प्रतवारीवर परिणाम झाला आहे. सध्या मागणीच्या तुलनेत पालेभाज्यांची आवक कमी प्रमाणात होत आहे. कोथिंबीर, मेथी, पालकसह सर्व पालेभाज्यांचे दर तेजीत असल्याची माहिती छत्रपती श्री शिवाजी मार्केट यार्डमधील पालेभाजी व्यापारी राजेंद्र सूर्यवंशी यांनी दिली.

पुणे विभागातून सध्या पालेभाज्यांची आवक कमी प्रमाणावर होत आहे. पावसामुळे पालेभाज्या खराब होण्याचे प्रमाण मोठे आहे. पालेभाज्या डागाळल्या आहेत. चांगल्या प्रतीच्या पालेभाज्यांना दर मिळाले आहेत. घाऊक बाजारात मेथी, कोथिंबीर, पालकासह सर्व पालेभाज्यांच्या दरात वाढ झाली आहे. पालेभाज्यांची नवीन लागवड होण्यास किमान महिनाभराचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे पालेभाज्यांचे दर गणेशोत्सवापर्यंत तेजीत राहणार आहेत, असे त्यांनी नमूद केले.

कोथिंबीर, मेथी या पालेभाज्यांना मागणी वाढली आहे. पुणे विभागात संततधार पाऊस सुरू असल्याने पालेभाज्या खराब झाल्या आहेत. मार्केट यार्डातील घाऊक बाजारात कोथिंबिरीच्या एका जुडीचा दर ४० ते ४५ रुपयांपर्यंत आहे. वाहतूक खर्च, हमाली असे खर्च विचारात घ्यावे लागतात. परराज्यांतून होणारी कोथिंबिरीची आवक सध्या बंद आहे. पावसामुळे लातूर भागातील कोथिंबिरीचे नुकसान झाले आहे. किरकोळ बाजारात कोथिंबीर, मेथी, पालकवगळता अन्य पालेभाज्यांचे दर २५ ते ४० रुपयांपर्यंत आहेत. प्रकाश ढमढेरे, भाजीपाला व्यापारी, किरकोळ बाजार पुणे विभागात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे पालेभाज्या खराब झाल्या आहेत.

# माँ जिजाऊच्या चरणी नतमस्तक होऊन रविकांत तुपकर यांचे शेतकऱ्यांसाठी अन्नत्याग आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : रविकांत तुपकर हे नाव म्हटलं की सरकारला घाम फुटतो कारण रविकांत तुपकर यांचे आंदोलन हे शेतकरी हितासाठी नेहमीच असते मात्र आंदोलन करत असताना मागण्या पूर्ण होईपर्यंत किंवा त्या मागण्या मार्गी लागेपर्यंत रविकांत तुपकर आंदोलन मागे घेत नाहीत हे जवळपास बुलढाणा जिल्ह्यासह सरकारला सुद्धा माहिती आहे आंदोलनामधून काहीतरी शेतकऱ्यांचा फायदा झाला पाहिजेत हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून रविकांत तुपकर आंदोलन करत असतात आता असाच आंदोलनाचा एल्गार रविकांत तुपकर यांनी राजमाता राष्ट्रमाता मासाहेब जिजाऊ यांच्या सिंदखेडराजा यांच्या राजवाड्या समोरून सुरू करणार आहेत या संदर्भात रविकांत तुपकर यांनी पत्रकार परिषद घेऊन त्याप्रमाणे घोषणा केली आहे ३ सप्टेंबर पर्यंत शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या विविध मागण्या जर मान्य झाल्या नाही तर ४ सप्टेंबर पासून अन्नत्याग आमरण उपोषणाचा एल्गार रविकांत तुपकर हजारो शेतकऱ्यासह पुकारण्याचा इशारा दिला आहे त्यामुळे सरकार या आंदोलनाकडे कोणत्या नजरेने पाहते व तीन सप्टेंबरच्या अगोदरच मागण्या मान्य होतात का किंवा उपोषण सुरू झाल्यावर सरकार मागण्या मान्य करणार हे पाहणे गरजेचे आहे रविकांत तुपकर जवळपास २० ते २२ वर्षापासून आंदोलनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी अहोरात्र प्रयत्न करीत आहेत हे प्रयत्न करीत असताना अनेक वेळा तीव्र स्वरूपाचे आंदोलन त्यांनी केलेले आहे मात्र प्रत्येक आंदोलनाला यश आल्याचे सुद्धा सर्वांनाच माहिती आहे सरकार म्हटल्यावर थोडाफार उशीर होणारच मात्र जगाचा पोशिंदा शेतकरी राजा यांच्याकडे दुर्लक्ष करणे किंवा त्यांच्या मागण्याकडे निष्काळजीपणाने पाहणे हे चुकीचे आहे त्यामुळे सरकारचे लक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्र्नाकडे वळविण्यासाठी रविकांत तुपकर आंदोलनाच्या माध्यमातून नेहमीच तयार असतात रविकांत तुपकर यांच्या पाठीमागे मोठा राजकीय पाठिंबा नाही मात्र शेतकरी राजा व युवकांचा रविकांत तुपकर यांना नेहमी पाठिंबा मिळालेला आहे शेतकऱ्यांच्या मागण्या सोडून घेण्यासाठी रविकांत तूपकर यांनी लोकसभेत सुद्धा उडी घेतली होती मात्र त्यांना त्या ठिकाणी अतिशय कमी प्रमाणात अपयश आले मात्र त्यांनी हिम्मत न हरता निवडणूक दर पाच वर्षांनी येत असते मात्र शेतकऱ्यांचे प्रश्र्न हे नेहमीच असतात व आपण शेतकऱ्यांसाठी झगडतो सत्तेमध्ये येण्यासाठी नाही त्यामुळे रविकांत तुपकर यांनी लोकसभेत आलेले अपयश त्याच वेळी बाजूला सारून आपली आंदोलनात्मक दिशा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतल्याचे दिसत आहे शेतकऱ्यांची कर्जमुक्ती हक्काचा पिक विमा सोयाबीन कापूस दरवाढ यासह शेतकरी शेतमजूर व तरुणांच्या हक्काच्या मागण्यासाठी रविकांत तुपकर हे चार सप्टेंबर पासून सिंदखेडराजा येथील राष्ट्रमाता मासाहेब जिजाऊ यांच्या राजवाड्यासमोर सकाळी दहा वाजता अन्नत्याग आमरण उपोषणाला सुरुवात करीत आहे त्यामुळे रविकांत तुपकर यांचे आंदोलन किती यशस्वी होते व सरकार रविकांत तुपकर यांच्या आंदोलनाकडे कोणत्या नजरेने पाहतात हे पाहणे गरजेचे आहे



वृत्तविशेष...

## ग्रामीण रुग्णालय रिसोड येथे शालेय आरोग्य तपासणी शिबीर संपन्न



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी** : राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण रुग्णालय रिसोड येथे शालेय आरोग्य तपासणीत आजारी आढळून आलेल्या विद्यार्थ्यांकरिता संदर्भ सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात दंतक्षय, दृष्टीदोष, त्वचारोग, रक्ताल्पता, हृदय विकार व ईतर आजारांची तज्ज्ञांकडून तपासणी करुन योग्य ते उपचार व मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरांकरिता ग्रा. रु. रिसोड चे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रशांत पवार साहेब,बालरोगतज्ज्ञ डॉ. वाशिमकर, नेत्ररोगतज्ज्ञ राठोड सर तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम चे सर्व वैद्यकीय आधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## बैलपोळा सणासाठी नवनवीन साहित्यांनी सजली बाजारपेठ



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : वर्षभर शेतामध्ये राबराब राबणाऱ्या बैल व दुखत्या जनावरांच्या उपकारातून उतराई होण्याचा दिवस म्हणजेच बैलपोळा हा बळीराजासाठी अत्यंत महत्त्वाचा. या दिवशी बळीराजाकडे पैसा असो किंवा नसो, मात्र बळीराजा उधारी वारी करून का होईना हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतो. अवघ्या दोन दिवसांवर हा सण साजरा होणार असून त्यासाठी बाजारपेठा सजल्या आहेत. दुकानदारांनी देखील बैलपोळ्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे सजावटीचे सामान ठेवले असून शेतकरी देखील हळूहळू आता दुकानांकडे फिरू लागले आहेत. वाढत्या महागाईमुळे सध्या बाजारपेठेमध्ये भाव वाढ दिसून येते. मात्र बळीराजाला या वस्तू खरेदी करून बैलपोळ्याचा सण साजरा करणं हे महत्तवाचं आणि आनंददायी असल्याचं शेतकऱ्यांनी सांगितले.

# कमिशन खोरीलावाचा फोडण्यासाठी मी जनतेचा सक्षम उमेदवार भैय्यासाहेब पाटील

## – पत्रकार परिषद घेऊन केली सुरुवात – भैय्यासाहेब पाटील आज पासून मैदानात

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर विधानसभा मध्ये जो अन्याय अत्याचार मागील वीस पंचवीस वर्षापासून सुरू आहे त्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी संविधानिक जे काही आयोग आहेत त्या आयोगाचा वापर करून येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मेहकर विधानसभा जनतेचा उमेदवार म्हणून उमेदवारी घोषित करीत असल्याचे भैय्यासाहेब पाटील हे म्हटले आहे ते पुढे म्हटले सध्याचे जे लोकप्रतिनिधी आहेत गेल्या पंधरा वर्षांपासून त्यांनी लोककल्याणकारी योजना कोणतीच न वापरता फक्त कमिशन खोरी चालू असल्याचा आरोप केला आहे याल्या फोडण्यासाठी आणि एक चांगलें कार्य करण्यासाठी मी ठामपणे सक्षमपणे या विधानसभेची निवडणूक लढणार असल्याचे भैय्यासाहेब पाटील यांनी पत्रकार परिषद मध्ये म्हटले आहे..



मेहकर संत श्री गजानन महाराज सेवा समितीच्या माध्यमातून भैय्यासाहेब पाटील हे आज पासून मेहकर विधानसभा निवडणुकीसाठी सज्ज झाले असून त्यांनी ३१ ऑगस्ट रोजी पत्रकार परिषद घेऊन मेहकर मतदारसंघात निवडणूक लढविण्यासंदर्भात माहिती दिली मी सध्या तरी कोणत्याही पक्षाकडे इच्छुक नसून मी जनतेचा उमेदवार आहे जनतेच्या हितासाठी मी मेहकर विधानसभेमध्ये निवडणूक लढवत असून जनता जनार्दन मला नक्कीच आशीर्वाद देईल असा विश्र्वास भैयासाहेब पाटील यांनी व्यक्त केला.

भैय्यासाहेब पाटील म्हणाले की गेल्या २० ते २२ वर्षापासून मी जनतेच्या संपर्कात आहे राजकारणात नेहमी सक्रिय असून राजकारणाच्या माध्यमातून शेतकरी गोरगरीब सुशिक्षित बेकार महिलावर्ग यांच्या प्रश्र्नासाठी नेहमी प्रयत्न करीत असतो मेहेकर लोणार मिळून असलेल्या मतदारसंघात गेल्या पंधरा वर्षाच्या कार्यकाळात कोणताच पाहिजे तसा विकास झालेला नाही समस्या जैसे थे तैसे कायमच आहेत मेहकरचे बसस्थानकाचे भिजत घोंगडे गेल्या चार ते पाच वर्षापासून जसेच्या तसेच आहे एवढे वर्ष बस स्थानक तयार करण्यासाठी लागत आहेत तर इतर विकासाच्या नावाने बोंबाबोंब असल्याचे भैय्यासाहेब पाटील यांनी पत्रकारांना बोलताना सांगितले सध्या तरी मी कोणत्याच पक्षाकडून संपर्क किंवा प्रचार करीत नसून वेळेवर घडणाऱ्या घडामोडीवर लक्ष ठेवून आहे.

भाजपच्या माध्यमातून माझी सुरुवात झाली असून २०२२ मध्ये मी भाजपच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला आहे तर श्री गजानन महाराज सेवा समितीच्या माध्यमातून मी सध्या काम करीत असून येणाऱ्या निवडणुकीत मी जनतेचा उमेदवार म्हणून निवडणुकीसाठी सामोरे जाणार आहे जनतेच्या अडचणी समस्या सोडविण्यासाठी मी २४ तास जनतेच्या सेवेत राहील मेहकर मतदार संघाच्या विकासासाठी मी अहोरात्र शासनापर्यंत व प्रशासनापर्यंत प्रयत्न करणार असून जनतेने मला मतदानरुपी आशीर्वाद द्यावेत आतापर्यंत जे सरकार आले त्यातील सत्ताधारी आमदारांनी कोणताच विकास मेहकर मतदार संघात केल्याचे दिसत नाही मेहकर मतदार संघात अनेक समस्या आहेत सुशिक्षित बेकारांची संख्या वाढली आहे,अनेक गावांना रस्ते नाहीत कोट्यावधी रुपयाच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना सुरू आहेत मात्र या योजना अनेक ठिकाणी निकृष्ठ दर्जाच्या व अर्धवट परिस्थितीमध्ये असल्यामुळे शासनाचे कोट्यावधी रुपये पाण्यात जात आहे विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर अनेक जण आपापल्या परीने आश्र्वासने देत असतात मात्र मी केवळ आश्र्वासन न देता जनतेच्या आशा पूर्ण करण्याचा नक्कीच प्रयत्न करणार आहे जनतेने मला सहकार्य करावे असे आवाहनही यावेळी भैय्यासाहेब पाटील यांनी केले तर आज पासून त्यांनी जनतेशी संपर्क सुरू केला असून हे मेहकर मतदार संघाची निवडणूक लढविण्यासाठी ते ठाम आहेत

## नवी मुंबईला पाणीपुरवठा करणारे मोरबे धरण भरले

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर स्वत:च्या मालकीचं धरण असणारी नवी मुंबई ही एकमेव महानगरपालिका असून मोरबे धरणामुळे नवी मुंबई ही जलसमृध्द महानगरपालिका म्हणून ओळखली जाते. पाताळगंगा नदीची उपनदी असलेल्या धावरी नदीवर खालापूर तालुक्यात असलेलं ४५० दललि प्रतिदिन क्षमतेचं मोरबे धरण पूर्ण भरलं असून शुक्रवारी आमदार गणेश नाईक आणि महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ कैलास शिंदे यांच्या शुभहस्ते मोरबे धरण प्रकल्पस्थळी पारंपरिक पद्धतीनं जलपूजन करण्यात आलं. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे आणि इतर विभागप्रमुख, अधिकारी उपस्थित होते.

## पुढच्या पाच वर्षात महिलांच्या खात्यात १ लाख जमा करू

## अनिल देशमुखांच्या बालेकिल्ल्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा

दैनिक आपला विदर्भ





**नागपूर/प्रतिनिधी** : भावाच्या नात्याने तुम्ही जी राखी मला बांधलीय त्या अनुषंगाने तुमचे संरक्षण करणे हे माझे एक भाऊ आणि सरकार म्हणून कर्तव्य आहे. राज्यातील अडीच कोटी म हिलांना १५०० रुपये महिना त्यांना सक्षम करण्यासाठीचा निर्णय आम्ही घेतलाय. त्यातून दोन कोटी महिलांच्या खात्यात १५०० रुपये टाकण्याचा निर्णय घेतलाय. अजित दादा शब्दाचा पक्का आहे. त्यामुळे पुढच्या पाच वर्षात लाडकी बहीण योजनेतून महिलांच्या खात्यात १ लाख रुपये जमा होईल. अशी मोठी घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे.

अजित पवार यांची जनसन्मान यात्रा आज नागपूर जिल्ह्यातील काटोल विधानसभा मतदारसंघात आली आहे. दरम्यान, काटोलच्या कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये आयोजित कार्यक्रमात अजित पवार यांनी लाडक्या बहिणींशी आणि शेतकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी सरकारच्या वतीने अनेक आश्वासनांचा पाऊस पाडला. काटोल हा माजी गृहमंत्री असलेल्या अनिल देशमुख यांचा मतदारसंघ असून अजित पवार गट काटोलच्या जागेसाठी आग्रही असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यासाठीच अजित पवार यांनी जन सन्मान यात्रा काटोल विधानसभा मतदार संघात ठेवली आहे. मात्र दुसरीकडे भाजप पण काटोलच्या जागेसाठी आग्रही असल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे अनिल देशमुखांच्या बालेकिल्ल्यात आज अजित पवार यांची तोफ कडाडली असल्याने या जागेवर त्यांच्या पक्षाने एकप्रकारे शड्डू ठोकला असल्याचे बोलले जात आहे.

नागपूर जिल्ह्यातील काटोलच्या कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये आयोजित कार्यक्रमात अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, शेतकऱ्यांनी वीज बिलाचे टेन्शन घेऊ नये. शेतकऱ्यांचे वीज बिल माफ करण्यात आले आहे. सोबतच ज्या शेतकऱ्यांचे जुने बील थकीत आहे त्यावरही विचार सुरु आहे. शेतकऱ्यांना प्रतिलिटर ५ रुपये दुधात अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आलाय. तर संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी काटोलला कारखाना देणार असल्याची मोठी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे.

लाडकी बहीण योजनेत ज्यांचं उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी आहे, त्यांनी फॉर्म भरा. त्यासाठी राष्ट्रवादीने हेल्पलाईन दिलीय त्यांची मदत घ्या. महिला, शेतकरी, कष्टकरी लोकांना मदत व्हावी म्हणून अनेक योजना सरकारने आणल्या आहेत. काटोल इथे पक्षाच्या कार्यालयाचं उद्घाटन केलंय. लोकं त्याला चांगला प्रतिसाद देतोय. तब्बल ४६ हजार कोटी आम्ही लाडकी बहिण योजनेवर खर्च करणार आहोत. त्यात डायरेक्ट पैसे खात्यात देतोय, त्यात कुठलीही मध्यस्थी नाही. विधानसभा निवडणूक झाल्यावर महायुतीचे सरकार येणार आहे. माय माऊलीं आम्हाला निवडून देणारच आहेत. तर पुढे पाच वर्षात लाडकी बहीण योजनेतून महिलांच्या खात्यात १ लाख जमा करू असेही अजित पवार म्हणाले.

## अतिदुर्गम भिंगारा येथे चुनाव पाठशाळेतून आदिवासीमध्ये जनजागृती

दैनिक आपला विदर्भ



**बुलडाणा/प्रतिनिधी** : जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जळगाव जामोद तालुक्यातील अतिदुर्गम असलेल्या भिंगारा येथे चुनाव पाठशाळा अंतर्गत आगामी मतदानाबाबत आदिवासी समुदायामध्ये जनजागृती केली. तसेच जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी जिल्ह्याचे शेवटचे टोक असलेल्या गौमाल या आदिवासी पाड्यावर ३ किलोमीटरची जंगलातील खडतर रस्त्यावरून पायपीट करुन वैयक्तिक वन अधिकार आणि सामाजिक वन अधिकाराबाबत वनविभागाच्या अधिकाऱ्यांना सुचना केली. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सालाईबन येथे वृक्षारोपण केले.

मुसळी पिकाच्या आधुनिक शेतीबाबत ग्रुप फार्मिंग करून मोठ्या प्रमाणावर नफा कमाविण्याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच मुसळी पिकाच्या लागवडीखालील क्षेत्रात वाढ करण्याबाबत कृषी अधिकारी यांना सुचना दिल्या. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी संग्रामपूर तालुक्यातील प्राचीन बौद्ध स्तूपाचे अवशेष सापडलेल्या भोण येथे भेट देवून पाहणी केली. तसेच विकास आराखड्याबाबत संबंधित विभागाच्या अधिकारी यांना सुचना केल्या.

तसेच भोण गावाच्या पुनर्वसन होत असलेल्या ठिकाणी भेट देऊन तेथील बांधकाम, सोयी सुविधांची पाहणी केली. करमोडा येथे स्वयंसेवी संस्थेच्या नदी खोलीकरणाच्या कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक आणि बाजारात चांगली किंमत असणाऱ्या पिकांची लागवड करण्याबाबत मार्गदर्शन केले.

## पंतप्रधान मोदींनी मागितली माफी; जरांगे पाटील म्हणाले, उद्घाटन करणाऱ्याचा काय दोष

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी** : मालवणमधील राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याच्या प्रकरणावरून राजकारण तापलं आहे. अशा विषयाचं राजकारण केलं जात असून सत्ताधारी आणि विरोधकांकडून एकम `कांवर आरोप प्रत्यारोप करण्यात येतायत. यावरून मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी राजकीय नेत्यांनी या प्रकरणात राजकारण करू नये असं आवाहन केलंय. या प्रकरणामुळे देशातील लोकांच्या भावना दुखावल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज हे देशाचे दैवत आहेत. एवढ्या मोठ्या स्मारकांबाबत दुर्दैवी घटना घडली आहे. यामुळे आमच्या भावना दुखावल्या आहेत. या प्रकरणी कोणीही राजकारण करू नका असं जरांगे पाटील म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी माफी मागितली त्यावर बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, यात उद्घाटन करणाऱ्याचा काय दोष आहे. घटना तर घडली आहे. त्यामुळे माफी मागितली काय नाही, मागितली काय मात्र आमची मानहानी व्हायची ती झाली आहे. मात्र या प्रकरणात जो कोणी दोषी असेल तो आत गेला पाहिजे.


# सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये वीज सुरक्षेला प्राधान्य द्या

## अधिकृत वीज जोडणी घेण्याचे महावितरणचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या गणेशाच्या आगमनाला काही दिवसच शिल्लक असून येणारा गणेशोत्सव आनंददायी व निर्विघ्न पार पडावा यासाठी सार्वजनिक उत्सव मंडळांनी वीज सुरक्षेबाबत गांभिर्याने उपाययोजना कराव्यात व घरगुती वीज पुरवठ्याच्या दराने सार्वजनिक उत्सवांसाठी उपलब्ध असलेली अधिकृत तात्पुरती वीजजोडणी घ्यावी असे आवाहन महावितरणतचे अधीक्षक अभियंता सुरेंद्र कटके यांनी केले आहे.

महाराष्ट्र विज नियामक आयोगाने महवितरणच्या अखत्यारीतील सर्वधर्मियांच्या सार्वजनिक उत्सवांना तात्पुरत्या वीजजोडणी साठी घरगुती वीज पुरवठ्याच्या वीजदरा दरानेच वीजदर निश्र्चित केले आहेत. त्यामुळे अनधिकृत वीज जोडणी टाळून सार्वजनिक उत्सवांकरिता अधिकृत वीजपुरवठा घ्यावा आणि सार्वजनिक सुरक्षेला महत्व द्यावे, या उत्सवांकरिताच्या मंडप, रोषणाई, देखावे, महाप्रसाद व इतर कार्यक्रमांसाठी लागणारी वीजव्यवस्था ही अधिकृत वीजकंत्राटदारांकडूनच करून घेण्यात यावी.



तातडीच्या मदतीची संभाव्य गरज पाहता सार्वजनिक मंडळांनी २४ तास सुरू असणारे निशुल्क क्रमांक १९१२, १९१२०, १८००२१२३४३५ किंवा १८००२३३३४३५ यावर संपर्क साधावा अथवा मोबाईल क्रमांकाची नोंद असलेले वीज ग्राहक त्यांच्या नोंदणिकृत मोबाईलवरून ०२२-५०८९७१०० या क्रमांकावर मिस कॉल करून अथवा छ्जझजथएठ १२ अंकी ग्राहक क्रमांक असा एसएमएस ९९३०३९९३०३ या क्रमांकावर पाठवून वीज पुरवठा खंडित असल्याची तक्रार देवू शकतात. याशिवाय सार्वजनिक उत्सव मंडळाच्या पदाधिका- यांनी महावितरणच्या संबंधित भागातील अभियंता आणि जनमित्रांचे मोबाईल क्रमांक जवळ ठेवावे, असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे.

### सार्वजनिक सुरक्षा महत्वाची

- गणेशोत्सव, नवरत्रोत्सव उत्सवात मोठ्या प्रमाणात सर्वसामान्य नागरिक सहभागी होतात, त्यांच्या आनंदावर विरजण पडू नये, कुठलीही अप्रिय घटना होऊ न देता भाविकांना नयनरम्य देखाव्यांचा आनंद घेता यावा यासाठी सार्वजनिक मंडळांनी रोषणाई आणि मिरवणूकीतील देखाव्यांचा परिसरातील विद्युत तारा आणि खांबांना स्पर्श होणार नाही याची खबरदारी घ्यावी.
- वीजपुरवठा आणि जनरेटरसाठी स्वतंत्र न्यूट्रल घेणे आवश्यक आहे, वीजपुरवठा बंद असतांना जनरेटर सुरु केल्यास एकाच न्यूट्रलमुळे जनरेटरमधील वीज ही लघुदाब बाहिनीत प्रवाहीत झाल्याने प्राणांकीत अपघात होण्याची शक्यता असते.
- जवळच्या वीजखांबावरून किंवा वीजवाहिन्यांवर आकोडे टाकून वीजपुरवठा घेऊ नये, यामुळे जीवित व वित्त हानीचा संभाव्य धोका अधिक आहे.
- वीज जोडणीसाठी लागणारी तार किंवा केबल विजेचा भार पेलण्यास सक्षम असल्याची खातरजमा करावी.
- तुटलेली किंवा लूज तार वापरू नये आणि वापरायची असल्यास प्रमाणित इन्सूलेशन टेप लाऊन जोडावी.